# मराठी भाषा आणि साहित्य विभाग
# वार्षिक अहवाल २०२३-२४

इस्माईल युसूफ महाविद्यालयातील मराठी विभाग आणि मराठी वाङ्मयमंडळातर्फे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ ह्या शैक्षणिक वर्षात अनेक अभ्यासपूरक उपक्रम राबविण्यात आले. मराठी वाङ्मय मंडळ दरवर्षी विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रम, स्पर्धा आणि उपक्रमांचे आयोजन करीत असते.मराठी वाङ्मय मंडळातर्फे, दिनांक १४/०१/२०२४ ते २८/०१/२०२४ ह्या कालावधीत 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा'; दिनांक १३/०२/२०२४ ते २१/०२/२०२४ ह्या कालावधीत जागतिक मातृभाषा दिंनानिमित्त विविध कार्यक्रम, स्पर्धा आणि उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. तसेच मराठी विभागाकडून दिनांक २४ फेब्रुवारी २०२४ आणि २७/०२/२०२४ ह्या दोन दिवशी 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा करण्यात आला.

- **मराठी भाषा संवर्धन पंधरवडा (दिनांक : १४/०१/२०२४ ते २८/०१/२०२४ )**

मराठी विभाग आणि मराठी वाङ्मयमंडळातर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त मराठी हस्ताक्षर, मराठी निबंधलेखन, ग्रंथ परीक्षण, कविता रसग्रहण, सर्जनशील लेखन, चित्रपट परीक्षण, प्रश्नमंजुषा, मराठी घोषवाक्य, ग्रंथ अभिवाचन, नाट्यवाचन, काव्यवाचन इत्यादी अकरा स्पर्धा आणि उपक्रमांचे आयोजन दिनांक १४/०१/२०२४ ते २८/०२/२०२४ ह्या कालावधीत भाषाभवन वर्गखोली क्रमांक १०७ मध्ये करण्यात आले.

मराठी निबंध स्पर्धेत 'मराठी भाषेची थोरवी' आणि 'बोलीभाषेतून मराठी भाषेचे संवर्धन आणि विकास' ह्या दोन विषयांवर विद्यार्थ्यांनी निबंधलेखन केले. प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन Google Form द्वारे करण्यात आले. प्रश्नमंजुषा स्पर्धेत 'मराठी भाषा आणि साहित्य' ह्या विषयांवर प्रश्न विचारण्यात आले होते.काव्यवाचन उपक्रमात मराठी भाषेतील विविध विषयांवरील कविता विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी सादर केल्या. ग्रंथ अभिवाचन स्पर्धेत इरावती कर्वे ह्यांच्या 'युगांत' ह्या ललित गद्य ग्रंथाचे तसेच नाट्यवाचन स्पर्धेत नाट्यछटाकार दिवाकर ह्यांच्या 'दिवाकरांच्या नाट्यछटा' ह्या पुस्तकातील विविध नाट्यछटांचे वाचन विद्यार्थ्यांनी केले. मराठी घोषवाक्य स्पर्धेत मराठी भाषेसंदर्भातील घोषवाक्ये विद्यार्थ्यांनी तयार केली. चित्रपट परीक्षण स्पर्धेत विविध मराठी चित्रपटांचे समीक्षण विद्यार्थ्यांनी केले. सर्जनशील लेखन स्पर्धेत विद्यार्थ्यांनी स्वरचित कविता, कथांचे लेखन केले.

'मराठी भाषा संवर्धन पंधरवड्या'निमित्त मराठी विभाग आणि मराठी वाङ्मयमंडळातर्फे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित सर्व स्पर्धा आणि उपक्रमांमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी भरघोस प्रतिसाद नोंदवला. सदर स्पर्धांच्या पारितोषिकांचे वितरण दिनांक २४/०१/२०२४ रोजी प्राचार्यांच्या शुभहस्ते प्राचार्य कक्षात तसेच भाषाभवन वर्गखोली क्रमांक १०७ मध्ये करण्यात आले.

## ➢ **जागतिक मातृभाषा दिन उपक्रम (दिनांक : १३/०२/२०२४ ते २१/०२/२०२४)**

मराठी विभाग आणि मराठी वाङ्मयमंडळातर्फे ‘जागतिक मातृभाषा दिना’निमित्त निबंधलेखन, कविता लेखन, वक्तृत्व, भित्तीपत्रके बनविणे(पोस्टर मेकिंग), प्रश्नमंजुषा इत्यादी स्पर्धा आणि उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

निबंध स्पर्धेत मातृभाषा, भारतीय भाषा, भारतीय ज्ञान परंपरा आणि भारतीय भाषा इत्यादी विषयांवर विद्यार्थ्यांनी निबंधलेखन केले. प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन Google Form द्वारे करण्यात आले. प्रश्नमंजुषा स्पर्धेत ‘भारतीय भाषा आणि साहित्य’ ह्या विषयांवर प्रश्न विचारण्यात आले होते. काव्यलेखन स्पर्धेत मराठी भाषा, मातृभाषा इत्यादी विविध विषयांवरील कवितांचे लेखन विद्यार्थ्यांनी केले. वक्तृत्व स्पर्धेत भारतीय भाषा, मातृभाषेचे महत्त्व इत्यादी विषयांवर विद्यार्थ्यांनी वक्तृत्व केले. भित्तीपत्रिका बनविणे स्पर्धेत अनेक भित्तीपत्रके विद्यार्थ्यांनी तयार केली. जागतिक मातृभाषा दिनानिमित्त मराठी भाषा आणि साहित्य विभागाकडून विद्यार्थ्यांना ‘शांतता मराठीचं कोर्ट चालू आहे.’ हा लघुपट गुरुवार, दिनांक १५/०२/२०२४ रोजी दाखविण्यात आले.

‘मराठी भाषा संवर्धन पंधरवड्या’निमित्त मराठी विभाग आणि मराठी वाङ्मयमंडळातर्फे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित सर्व स्पर्धा आणि उपक्रमांमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी भरघोस प्रतिसाद नोंदवला.

सदर स्पर्धांच्या पारितोषिकांचे वितरण ‘मराठी भाषा गौरव दिन’ कार्यक्रमात दिनांक २४/०२/२०२४ रोजी महाविद्यालयाच्या प्रेक्षागृहात करण्यात आले.

## ➢ **मराठी भाषा गौरव दिन (दिनांक २४ फेब्रुवारी २०२४)**

मराठी विभागातर्फे शनिवार, दिनांक २४ फेब्रुवारी २०२४ आणि मंगळवार, दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ ह्या दोन दिवशी कवी कुसुमाग्रज जयंतीनिमित्त मराठी भाषा गौरव दिनाचे आयोजन करण्यात आले होते . ह्या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून डॉ. श्यामल गरुड {सहायक प्राध्यापक (मराठी), मुंबई विद्यापीठ, मुंबई}ह्यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.विजय नारखेडे ह्यांनी भूषविले. ह्याप्रसंगी मराठी भाषा संवर्धन आणि कवी कुसुमाग्रज ह्यांच्याबद्दल मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. ह्याप्रसंगी ‘जागतिक मातृभाषा दिना’निमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांतील यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. ह्या कार्यक्रमाच्या प्रारंभी सरस्वती वंदना, कुसुमाग्रजांवरील महितीपटाचे सादरीकरण करण्यात आले तसेच कार्यक्रमाच्या शेवटी ‘मराठी अभिमान गीता’चे गायन करण्यात आले. ह्या कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी ह्यांची आवर्जून उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मराठी विभागातील विद्यार्थ्यांचे साहाय्य लाभले.

## ➢ मराठी भाषा गौरव दिन (दिनांक २७ फेब्रुवारी २०२४)

मराठी विभाग आणि मराठी वाङ्मय मंडळ ह्यांच्या वतीने मंगळवार, दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ महाविद्यालयात वर्गखोली क्रमांक १०७ मध्ये काव्यवाचन उपक्रमाद्वारे 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा करण्यात आला. काव्यवाचन उपक्रमात मराठी भाषेतील विविध विषयांवरील कविता विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी सादर केल्या. तसेच कार्यक्रमाच्या शेवटी 'मराठी अभिमान गीता'चे गायन करण्यात आले.

**सहा.प्रा. समीर रामचंद्र वैरागी**
**मराठी विभाग प्रमुख**



'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' अंतर्गत आयोजित केलेल्या विविध स्पर्धांचे पुरस्कार वितरण



'आमदार सौभाग्यवती' नाटकाचे सादरीकरण

## मराठी विभागातील शिक्षकांची वैयक्तिक उपलब्धी (शै.वर्ष २०२३ - २४)

### ❖ सहा.प्रा. समीर रामचंद्र वैरागी :

१. विद्यापीठ अनुदान आयोग आणि मानव संसाधन विकास केंद्र, कुमाऊँ विद्यापीठ ह्यांचा ‘भारतीय साहित्य आणि भाषा’ ह्या विषयातील उजळणी वर्ग ‘अ+’ श्रेणी प्राप्त करून यशस्वीरित्या पूर्ण केला. (कालावधी : १६ ऑगस्ट २०२३ ते २९ ऑगस्ट २०२३)

२. विद्यापीठ अनुदान आयोग आणि गुरू अंगददेव मालवीय मिशन टीचर ट्रेंनिग सेंटर (GAD-MMTTC) ह्यांचा ‘E-Content Development’ ह्या विषयातील Faculty Development Program (FDP) ‘अ’ श्रेणी प्राप्त करून यशस्वीरित्या पूर्ण केला. (कालावधी : १० ऑक्टोबर २०२३ ते  १६ ऑक्टोबर २०२३)

३. विद्यापीठ अनुदान आयोग आणि गुरू अंगददेव मालवीय मिशन टीचर ट्रेंनिग सेंटर (GAD-MMTTC) ह्यांचा ‘NEP 2020 Orientation & Sensitization Programme’ ह्या विषयातील Faculty Development Program (FDP) यशस्वीरित्या पूर्ण केला.(कालावधी : ०९ जानेवारी २०२४ ते १८ जानेवारी २०२४)

४. विद्यापीठ अनुदान आयोग आणि गुरू अंगददेव मालवीय मिशन टीचर ट्रेंनिग सेंटर (GAD-MMTTC) ह्यांचा ‘AI Tools for e-Content Development and Teaching-Learning’ ह्या विषयातील Faculty Development Program (FDP) ‘अ’ श्रेणी प्राप्त करून यशस्वीरित्या पूर्ण केला.(कालावधी : ०१ एप्रिल २०२४ ते १२ एप्रिल २०२४)

५. श्री.बंकटस्वामी महाविद्यालय, बीड ह्यांच्या वतीने आयोजित ' ना.धों.महानोर : व्यक्ती आणि वाङ्मय ' ह्या एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभाग.(दिनांक : १९ जानेवारी २०२४)

६. मराठी अभ्यास मंडळ, मुंबई विद्यापीठ आयोजित एकूण तीन पुनर्रचित अभ्यासक्रम कार्यशाळांना उपस्थिती.



मराठी भाषा गौरव दिन - २०२४

## मराठी विभागातील विद्यार्थ्यांची वैयक्तिक उपलब्धी (शै.वर्ष २०२३ - २४)

## 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' अंतर्गत आयोजित केलेल्या विविध स्पर्धांचे निकाल (१४ जानेवारी २०२४ ते २८ जानेवारी २०२४)

१. **मराठी हस्ताक्षर स्पर्धा** (दिनांक : १५ जानेवारी २०२४)
   कु.आशिष सुभाष तायडे (द्वितीय वर्ष कला)

२. **मराठी निबंधलेखन स्पर्धा** (दिनांक : १६ जानेवारी २०२४)
   कु. तन्वी मारुती नावळे (प्रथम वर्ष कला)

३. **ग्रंथपरीक्षण स्पर्धा** (दिनांक: १७ जानेवारी २०२४)
   कु. संपदा हेमंत नार्वेकर (तृतीय वर्ष कला)

४. **कविता रसग्रहण स्पर्धा** (दिनांक : १८ जानेवारी २०२४)
   कु. तन्मय विनायक आंब्रे {इयत्ता बारावी (शास्त्र)}

५. **सर्जनशील लेखन स्पर्धा** (दिनांक : १९ जानेवारी २०२४)
   कु.आशिष सुभाष तायडे (द्वितीय वर्ष कला)

६. **चित्रपट परीक्षण स्पर्धा** (दिनांक : २० जानेवारी २०२४)
   कु.आशिष सुभाष तायडे (द्वितीय वर्ष कला)

७. **प्रश्नमंजुषा स्पर्धा** (दिनांक : २१ जानेवारी २०२४)
   कु. खुशी भालचंद्र घाडीगांवकर {इयत्ता बारावी (शास्त्र)}

८. **मराठी घोषवाक्य स्पर्धा** (दिनांक : २१ जानेवारी २०२४)
   कु.आशिष सुभाष तायडे (द्वितीय वर्ष कला)

९. **ग्रंथ अभिवाचन स्पर्धा** (दिनांक : २२ जानेवारी २०२४)
   कु.आशिष सुभाष तायडे (द्वितीय वर्ष कला)

१०. **नाट्यवाचन स्पर्धा** (दिनांक : २३ जानेवारी २०२४)
   कु.करीना भालचंद्र अडबल (तृतीय वर्ष कला)

११. **काव्यवाचन स्पर्धा** (दिनांक : २४ जानेवारी २०२४)
   कु.महेश रामदास सूर्यवंशी (द्वितीय वर्ष कला)



**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा**



**जागतिक मातृभाषा दिन**

## ‘जागतिक मातृभाषा दिन’ अंतर्गत आयोजित केलेल्या विविध स्पर्धांचे निकाल
## (१३ फेब्रुवारी २०२४ ते २१ फेब्रुवारी २०२४)

**१. निबंधलेखन स्पर्धा** (दिनांक : १३ फेब्रुवारी २०२४)

**वरिष्ठ महाविद्यालय**

प्रथम क्रमांक (मराठी निबंध) - कु.त्रिशला ज्ञानदेव रहाटे (तृतीय वर्ष वाणिज्य )

प्रथम क्रमांक (हिंदी निबंध) - कु. लक्ष्मी नरसैय्या रेड्डी (द्वितीय वर्ष कला)

द्वितीय क्रमांक (मराठी निबंध) - कु.यश्वी अंकुश बोले (द्वितीय वर्ष कला)

**कनिष्ठ महाविद्यालय**

प्रथम क्रमांक (मराठी निबंध) - कु.नयना सुशील विश्वकर्मा {इयत्ता अकरावी (कला)}

**२. कविता लेखन स्पर्धा** (दिनांक : १३ फेब्रुवारी २०२४)

प्रथम क्रमांक - कु.आशिष सुभाष तायडे (द्वितीय वर्ष कला)

द्वितीय क्रमांक - कु.त्रिशला ज्ञानदेव रहाटे (तृतीय वर्ष वाणिज्य )

**३. पोस्टर मेकिंग स्पर्धा** (दिनांक : १४ फेब्रुवारी २०२४)

**वरिष्ठ महाविद्यालय**

प्रथम क्रमांक - कु.त्रिशला ज्ञानदेव रहाटे (तृतीय वर्ष वाणिज्य )

द्वितीय क्रमांक - कु.नम्रता भागवत कदम (तृतीय वर्ष कला)

**कनिष्ठ महाविद्यालय**

प्रथम क्रमांक – कु.समिक्षा महेश मेस्त्री {इयत्ता अकरावी (वाणिज्य)}

द्वितीय क्रमांक - कु. क्रिश दीपक सावंत {इयत्ता अकरावी (कला)}

**४. प्रश्नमंजुषा स्पर्धा** (दिनांक : २१ फेब्रुवारी २०२४)

कु. दिप्ती प्रकाश पाटील (तृतीय वर्ष कला)

### ➢ तृतीय वर्ष कला (मराठी) विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी (शैक्षणिक वर्ष : २०२२ -२३)

❖ प्रथम क्रमांक : कु. सिद्धेश श्याम कांबळे




**'शांतता मराठीचं कोर्ट चालू आहे' ह्या लघुपटाचे सादरीकरण**